# माजी ग्रंथपाल डॉ. जे. बी. जाधव यांचे निधन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे



माजी ग्रंथपाल आणि ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. जे. बी. जाधव (वय ८५) यांचे मंगळवारी पहाटे बागलकोट (कर्नाटक) येथे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली असा परिवार आहे.

बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या उभारणीत त्यांचा मोठा वाटा राहिला. ग्रंथपाल म्हणून १९८९ ते ९५ पर्यंत त्यांनी जबाबदारी सांभाळली. निवृत्त झाल्यावर त्यांनी काही वर्षे 'सायबर'मध्येही काम केले. विद्यापीठाच्या विविध समित्यांचे काम करताना त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. 'विद्यार्थिप्रिय प्राध्यापक व लोकसंग्रह असणारा माणूस' अशी त्यांची ओळख होती.